# पोलीस आयुक्त, कार्यालय पुणे शहर,

**पत्ता.:** २, साधु वासवानी रोड, कॅम्प पुणे ४११ ००१.
**दुरध्वनी क्रमांक.:** ०२० -२६२०८३२५/२६३३२१००
**फॅक्स क्रमांक.:** ०२०- २६१२८१०५
**E-mail :-** cppune@nic.in, **Web Add.:-** www.punepolice.co.in,


**क्रमांक:-** परवाना शाखा/एनडीएएल/प्रेसनोट/३/२०१९, दिनांक.१३/०३/२०१९.

# प्रेसनोट

**विषय :-** शस्त्र परवाना धारक यांनी युनिक आयडेंटिफिकेशन क्रमांक प्राप्त करुन घेणेकरिता जाहीर सूचना...

केंद शासनाने दिनांक १६ जुलै २०१६ चे अधिसुचने अन्वये शस्त्र नियम २०१६ लागु केलेला आलेला असुन ,त्यामधील नियम- १५ नुसार प्रत्येक शस्त्र परवाना धारक यांना यु.आय.एन.नंबर (युनिक आयडेंटिफिकेशन क्रमांक) प्राप्त करुन घेणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. तथापि ज्या शस्त्र परवाना धारक यांनी अदयापपर्यंत यु.आय.एन.नंबर प्राप्त करुन घेतलेले नाहीत, त्यांनी सदरचे क्रमांक प्राप्त करुन घेण्यासाठी दिनांक ३१ मार्च २०१९ ही अंतिम मुदत केंद्र शासनाकडुन देण्यात आलेली आहे. तसेच ज्या शस्त्र परवाना धारक यांचेकडे यु.आय.एन नंबर नसेल अशा शस्त्र परवाना धारक यांचे शस्त्र परवाना रद्द समजण्यात येणार आहे.

तरी, पुणे शहर पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रातील सर्व शस्त्र परवानाधारकांना याद्वारे कळविण्यात येते की, ज्या अग्नीशस्त्र परवाना धारक यांनी अद्याप यु.आय.एन नंबर प्राप्त करुन घेतलेला नाही, अशा परवाना धारक यांना पोलीस आयुक्त कार्यालय येथे विहित फॉर्म उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. यास्तव सदर फॉर्ममध्ये माहिती अचुक भरुन फॉर्म नागरी सुविधा केंद्र, पोलीस आयुक्त कार्यालय पुणे शहर येथे दिनांक. २०/०३/२०१९ पर्यंत जमा करण्यात यावे. फॉर्म सोबत परवान्याची साक्षांकित प्रत व पॅन कार्डची छायांकीत पत्र जोडण्यात यावी. जे परवाना धारक यु.आय.एन नंबर मुदतीत प्राप्त करुन घेणार नाहीत त्यांचा शस्त्र परवाना रद्द होईल व त्यास ते स्वत: जबाबदार राहतील यांची नोंद घ्यावी.

COMMISSIONER OF POLICE PUNE CITY

१३/०३/१९

**(विक्रम पाटील)**
**सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन)**
**पोलीस आयुक्त, पुणे शहर करिता.**

प्रति